वित्त विभाग
जिल्हा परिषद धाराशिव
दुरध्वनी- (02472) 299122 इमेल: cafozpdharashiv@gmail.com

जा.क्र.जिपउ/वित्त/आस्था-1/243/2024 दिनांक :- 22.02.2024

प्रति,

……………………………………

……………………………………

……………………………………

**विषय :- जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत गट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती-2023 कागदपत्र पडताळणीकरीता दि. 27/02/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता उपस्थित राहणे बावत...**

**संदर्भ :** १) जिल्हा परिषद धाराशिव यांचेकडील सरळसेवा पदभरती सन 2023 साठीची जाहिरात क्र.1/2023 दि.05/08/2023

२) कनिष्ठ लेखा अधिकारी या पदासाठी IBPS मुंबई यांचेकडील Online परिक्षेतील प्राप्त निकाल

उपरोक्त विषयी जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत गट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती-2023 साठी जाहिरात क्र.1/2023 दि.05 ऑगष्ट, 2023 च्या अनुषंगाने IBPS कंपनी मार्फत घेण्यात आलेल्या **कनिष्ठ लेखा अधिकारी** या पदाच्या Online परिक्षेमधील प्राप्त निकालानुसार पात्र गुणवत्ताधारक उमेदवारांची यादी या जिल्हा परिषदेच्या www.zposmanabad.gov.in व जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथील www.osmanabad.gov.in_या संकेतस्थळावर दि.15/02/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**कनिष्ठ लेखा अधिकारी** पदासाठी जाहिरातीमध्ये नमुद विविध प्रवर्गातील रिक्त पदे भरणेसाठी प्रवर्गनिहाय कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या www.zposmanabad.gov.in व जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथील www.osmanabad.gov.in_या संकेतस्थळावर दि. 22/02/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**कनिष्ठ लेखा अधिकारी** संवर्गातील भरावयाच्या प्रवर्गनिहाय रिक्त पदासाठी कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक व इतर आवश्यक सर्व अभिलेखे तसेच जाहिरातीमधील नमूद आवश्यक कागदपत्राची पडताळणी **दि.27/02/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता कै.यशवंतराव चव्हाण, जिल्हा परिषद सभागृह धाराशिव** येथे करण्यात येणार आहे.

सबब याद्वारे आपणास कळविण्यात येते की, आपले मुळ शैक्षणिक व इतर आवश्यक अभिलेखे तसेच जाहिरातीमधील नमूद आवश्यक कागदपत्रे त्यांच्या एका साक्षांकित प्रतीसह पडताळणीसाठी दिनांक. 27/02/2024 रोजी वेळेवर उपस्थित रहावे. कागदपत्र पडताळणीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास गैरहजर राहणा-या उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीसाठी नंतर विचार केला जाणार नाही. सदर उमेदवारास निवड प्रक्रियेसंबंधात कोणाताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

**सोबत :- कागदपत्र पडताळणीसाठी घेवून यावयाच्या कागदपत्राची यादी**

**(सचिन इगे)**
**सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
जिल्हा परिषद धाराशिव.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:**

1.मा.जिल्हाधिकारी,धाराशिव तथा जिल्हा निवड समिती धाराशिव यांना माहितीस्तव सविनय सादर.

2.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांना माहितीस्तव सविनय सादर.

**सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
जिल्हा परिषद धाराशिव

**जिल्हा परिषद धाराशिव सरळसेवा पदभरती-२०२३**
**या कार्यालयाने प्रसिध्द करण्यात आलेल्या कनिष्ठ लेखा अधिकारी पदासाठी उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेऊन यावयाचे कागदपत्रांची यादी**

| अ.क्र | कागदपत्रे/प्रमाणपत्र |
|---|---|
| १. | संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट आऊट तसेच परीक्षा फी जमा केल्याचा पुरावा |
| २. | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| ३. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ४. | वयाचा पुरावा |
| ५. | जन्माचा पुरावा |
| ६. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याचा पुरावा |
| ७. | राखीव प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र,जातपडताळणी प्रमाणपत्र |
| ८. | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्ज सादर करण्याच्या दिनांकास वैध असणारे) |
| ९. | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| १०. | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| ११. | खेळाडुसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १२. | अनाथ आरक्षणकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १३. | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १४. | महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांमधील मराठी भाषेक उमेदवारांना सक्षम प्राधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १५. | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १६. | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १७. | लहान कंटुंबाचे प्रतिज्ञापत्र |
| १८. | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १९. | **MS-CIT** अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| २०. | टंकलेखन प्रमाणपत्र |
| २१. | लघुलेखन प्रमाणपत्र |
| २२. | अनुभव प्रमाणपत्र |
| २३. | नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा |
| २४. | छायाचित्र ओळख पुरावा (आधारकार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड,राज्य निवडणुक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, पारपत्र, राष्ट्रीयकृत बॅकेचे खातेपुस्तक) |

**(सचिन इगे)**
**सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
जिल्हा परिषद धाराशिव